सर्वे सुखिन: सन्तु

# पुष्पक

## को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

रजि नंबर : (बी.ओ.एम./डब्ल्यु.एस./आर.एस.आर./सी.आर./८३७४/दि.३१/१२/९८)

## ५०० कोटी व्यवसायपुर्ती



## २८ वा

## वार्षिक अहवाल २०२५-२०२६

२०२, दामजी शामजी बिझनेस पार्क ७८, हुमा सिनेमाच्या मागे, स्टेशनरोड,
कांजुरमार्ग (प.), मुंबई ४०० ०७८. ☎ ७०२८०००७८७
www.pushpaksociety.com pushpakcr@gmail.com

# पुष्पक
## को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.



**श्री. व्हि. जी. पवार**
मार्गदर्शक
संस्थापक : ज्ञानदीप को. ऑप. क्रे. सोसा.



**श्री. गणपतराव पवार**
अध्यक्ष



**श्री. अर्जुन भोसले**
उपाध्यक्ष



**श्री. परशुराम फडतरे**
संचालक

## संचालक



श्री. अंकुश संकपाळ



श्री. संभाजी पवार



श्री. व्यासदेव पवार



श्री. विनायक तळेकर



श्री. संकेत पवार



सौ. शशिकला पवार



सौ. मिनाक्षी ढमाळ



श्री. श्रीकांत कांबळे



श्री. नारायण कुदळे



श्री. नारायण पालवे



सौ. शितल पाटील
तज्ञ संचालिका



श्री. संतोष पाटणे
तज्ञ संचालक



श्री. किरण पवार
मुख्यव्यवस्थापक



श्री. उध्दव भोसले
व्यवस्थापक



श्री. प्रदिप निकम
व्यवस्थापक

२८ वा वार्षिक अहवाल २०२५-२०२६

# पुष्पक
## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## ❁ २८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❁

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **२८** वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६** रोजी **सकाळी १०.३० वाजता** संस्थेचे अध्यक्ष **मा. श्री. जी. ए. पवार** यांच्या अध्यक्षतेखाली **आर. के. हॉल, हुमा सिनेमा जवळ, स्टेशन रोड, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८** येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

### ❁ सभेपुढील विषय ❁

१) दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा अहवाल नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सादर करुन त्यास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) लेखापरिक्षकांकडून आलेल्या सन २०२५-२६ सालचा अहवाल वाचुन नोंद घेणे.
५) सन २०२६-२७ सालासाठी वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६) मागील वर्षी अंदाजपत्रकाप्रमाणे जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२६-२०२७ सालचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०२४-२५ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकाने दिलेल्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ४९ अन्वये कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.
९) आर्थिक अडचणीत असलेल्या व संस्थेला सोयीस्कर असलेल्या पतसंस्थेचे आपल्या संस्थेत विलीनीकरण करणेबाबत.
१०) संचालक मंडळ, सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबतची माहिती देणे.
११) पोटनियम दुरुस्ती करणेबाबत.
१२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि. २९ जुलै २०२५ चे पत्रान्वये सुधारीत आदर्श उपविधी दुरुस्तीसह स्वीकारणे.
१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला सहकारी,
**अर्जुन ज. भोसले**
उपाध्यक्ष
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई - ४०० ०७८.
दिनांक : १ सप्टेंबर २०२६

### ❁ विशेष सुचना ❁

१) गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२) ज्या सभासदांना सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी दिनांक २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात पाठवाव्यात. आयत्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३) संस्थेची वार्षिक अहवालाची प्रत संस्थेची वेबसाईट www.pushpaksociety.com वर उपलब्ध आहे.
४) ज्या सभासदांनी आपला ई-मेल आयडी किंवा मोबाईल क्र. याबाबतची माहिती संस्थेत नोंद केली नसेल त्यांनी आपल्या जवळच्या संस्थेच्या शाखेत किंवा मोबाईल क्र. ७०२८०००७८७ वर सादर करावी.

# अध्यक्षांचे मनोगत...

**सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,**

पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या आपल्या संस्थेचा आज **२८** वा वार्षिक अहवाल सादर करीत आहे. २८ वर्षाचा कालावधी म्हणजेच जुन्या पर्वातून एका नवीन आधुनिक पर्वाकडे चाललेली आपली वाटचाल पाहता मन आनंदाने भरुन आले आणि सांगत आहे की यशाचे शिखर आता जवळ आले आहे. महाराष्ट्रात सहकार क्षेत्र फार मोठे आहे आणि त्याचे महत्व काय आहे समाजाला पटवून देण्याचे काम आपल्या सारख्या पतसंस्था करीत असतात. ज्या माणसाला पत नाही अशा माणसांचा उध्दार पतसंस्था करीत आहेत आणि यामध्ये आपली "पुष्पक" कुठेही मागे राहिली नाही. सर्वांच्या बरोबरीत म्हणा किंवा एक पाऊल पुढे म्हणा असा आपला प्रवास चालू आहे. हा प्रवास करत असताना अनेक जणांचे सहकार्य लाभले आहे. सभासदांनी संस्थेवर जो विश्वास दाखवला आहे तो विश्वास सार्थ करण्याचा आम्ही सदैव प्रयत्न करीत असतो. संस्थेचा प्रगतीचा आलेख जर पाहीला तर त्याचा चढता क्रम आपणां सर्वांना दिसून येईल.

संस्थेची यशस्वीपणे होणारी वाटचाल गतीमान धोरणे, वैविध्यपूर्ण योजना, विविध उद्दिष्टे यांची पुर्तता करण्यासाठी संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग तसेच ठेव प्रतिनिधी यांचा सर्वांचा मोलाचा वाटा आहे. सभासदांच्या गरजांची पुर्तता करणे हे संस्थेचे प्रथम कर्तव्य आहे. या कर्तव्यात कोणतीही कसूर आम्ही ठेवत नाही. ज्या पध्दतीने संस्था सभासदांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असते तसेच सभासदांनी सुध्दा संस्थेप्रती असणारी आपली कर्तव्ये पार पाडावीत. उदा. थकीत कर्जाचे हप्ते भरणे, आपली के वाय सी पूर्ण करुन संस्थेच्या कार्यात मदत करावी. जर कर्जदार आपले कर्ज व्यवस्थित भरत नसेल तर त्याला कर्ज भरण्यास प्रवृत्त करावे. जामीनदारांनी सुध्दा संस्थेत येऊन कर्जदारांची चौकशी करावी. कर्जदार वेळेत भरणा करतो की नाही, जर करत नसेल तर त्याला समज देण्यात यावी, जर कर्जदाराने कर्ज वेळेत भरले नाही तर अशा लोकांसाठी संस्था सुध्दा मागे पुढे न पाहता कारवाई करण्यास सक्षम राहिल. अशी कठोर कारवाई करण्यासाठी संस्थेला प्रवृत्त करु नका. आपले व संस्थेचे हित कशात आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न करावा आणि त्यानुसार पाऊले उचलावीत. सभासदांना कळकळीची विनंती करुन सांगत आहे की आपले कर्जाचे हप्ते वेळेवर व नियमित भरुन एक चांगला कर्जदार व जागरुक सभासद बनून संस्थेच्या प्रगतीचा एक अमुल्य भाग बना.

समाजातील अग्रगण्य संस्थांमध्ये आपल्या संस्थेचा समावेश होत आहे. ही एक अभिमानाची आणि उल्लेखनीय अशी बाब आहे. सीबीएस ऑनलाईन पध्दतीचा अवलंब करुन अधिक सोप्या पध्दतीने कामकाज चालू आहे, मोबाईल ॲप मुळे तर आता घरी बसल्या जागेवर सुध्दा आपल्याला सर्व व्यवहाराची माहिती मिळू लागली आहे. संस्थेच्या वेबसाईटवर प्रत्येक गोष्टींची इत्तंभुत माहिती मिळते. संस्थेने आतापर्यंत २८ वर्षाच्या कालावधीत १८ शाखांची निर्मिती केली. त्यातील १३ शाखा स्वमालकीच्या आहेत. मुंबई, पुणे, सातारा या शहरात पुष्पकची भरारी दिसुन येत आहे. संस्थेच्या बोध वाक्याप्रमाणेच "सर्वे सुखीन संतु" संस्था कार्य करीत आहे. आणि हे कार्य असेच अविरतपणे चालू राहणार आहे. या कार्यासाठी आम्ही सर्वजण असेच कायमस्वरुपी वचनबध्द राहु असा विश्वास मी आपणा सर्वांना देत आहे.

आपण आजपर्यंत आपल्या सहकार्याचा व मैत्रीचा हात जसा पुढे केला आहे तो कायम असाच आमच्या सोबत रहावा. संस्थेप्रती असणारी आपली आपुलकी व प्रेम कायम राहु द्यावा. संस्थेने जो प्रगतीचा टप्पा पार केला आहे त्या यशासाठी मी व माझे सहकारी संचालक मंडळ तसेच सर्व कर्मचारी वृंद, दैनंदिन ठेव प्रतिनिधी आपले सर्वांचे आभार मानतो आणि इथून पुढेही आपले सर्वांचे कृपाशिर्वाद आम्हाला लाभोत अशी आपणां सर्व सभासदांकडून अपेक्षा करतो. पुन्हा एकदा आपल्या सर्वांचे मन:पुर्वक आभार मानून माझे मनोगत पुर्ण करतो. धन्यवाद !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

**।। विना सहकार नाही उध्दार ।।**

आपला हितचिंतक,

**श्री. गणपतराव आनंदराव पवार**

अध्यक्ष

# ❇ वार्षिक कार्यवृत्तांत ❇

**सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,**

संस्थेवर दर्शविलेल्या विश्वासाप्रती व संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीस सदैव पाठिंबा देणाऱ्या भागधारकांचा मी ऋणी आहे. प्रगतीमध्ये सातत्याने सहकार्य करणाऱ्या सभासदांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. संस्थेला सातत्याने प्रगती पथावर अग्रेसर ठेवण्यास संस्थेच्या सर्व कर्मचारीवृदांचे लाभत असलेले योगदान देखील आव्हानात्मक परिस्थितीत महत्वाचे ठरते. संस्थेच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वर्गाचे संचालक मंडळाच्या वतीने मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

संस्थेचा सन २०२५-२६ चा २८ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकानी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. अहवालसाली संस्थेच्या ठेवी मध्ये १३.७३% व कर्जामध्ये १३.५८% वाढ होऊन एकुण संस्थेच्या खेळत्या भांडवलात १२.९६% वाढ झालेली आहे. संस्थेच्या एकुण उत्पन्नात वाढ झाल्यामुळे नफा सुध्दा वाढलेला आहे. सभासदांमध्ये वाढ होऊन भाग-भांडवलात वाढ झाली आहे.

## संचालक मंडळ :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या २२ सभा घेण्यात आल्या. या सभांना उपस्थित असलेल्या संचालकांची माहिती अहवालात दिलेली आहे. संचालक मंडळातील सदस्याला संस्थेच्या शाखांचा विकास व नियंत्रणाची जबाबदारी सोपवून त्यांना त्या शाखेचे पालकत्व देण्यात आलेले आहे. संस्थेच्या शाखेमध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी संचालक उपस्थित असतात. संचालक मंडळातील सर्व संचालकांच्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

## सभासद :

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस सभासद संख्या १८६०९ होती. यामध्ये प्रत्यक्षात २५६० नविन सभासदांची नोंद झाली आहे. अहवाल सालात १२८ सभासदांनी राजीनामा दिले आहे. त्यामुळे अहवाल सालाअखेरीस संस्थेचे एकूण सभासद २१०४१ झाले आहेत. सभासदांनी ३१ मार्च २०२६ अखेर जमा असलेला भाग रक्कमेचे दाखले घेवून जावेत. मा. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या सुधारित परिपत्रकानुसार एका सभासदाला रु. ५ लाखांपर्यंत भाग खरेदी करता येतील. जास्तीत जास्त भाग खरेदी करुन संस्थेच्या विकासाला हातभार लावावा.

## भागभांडवल :

संस्थेचे अहवाल सालच्या सुरुवातीस रु. ६,५१,७७,८००/- एवढे वसुल भागभांडवल होते. अहवाल सालात नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून जादा भागभांडवल रु. ५५,२१,७००/- वसुल झाल्याने वाढ झाली आहे. तसेच १२८ सभासदांनी राजीनामा दिल्याने रु. २६,००,८००/- भागभांडवल कमी होऊन अहवाल सालाअखेर वसुल भागभांडवल रु. ६,८०,९८,७००/- एवढे झाले आहे. भागभांडवलात होणारी वाढ म्हणजेच सभासदांचा संस्थेवरील असलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे. भागभांडवल अहवाल वर्षात ४.४८% वाढ झाली आहे.

## राखीव निधी :

गतवर्षीच्या रु. १,९४,२६,५६१/- निधीमध्ये नफ्यातून रु. ३०,८८,९१२/- व आर्थिक वर्षात प्रवेश फी नाममात्र सभासद फी रु. ५९,६००/- न घेतलेला लाभांश असे रु. ५८,६७३/- अशी रु. ३२,०७,१८५/- ने वाढ होऊन अहवाल सालाअखेर राखीव निधी रु. २,२६,३३,७४६/- झालेला आहे. निधीतील वाढीचे प्रमाण १६.५१% असुन निधीची कायद्यातील तरतुदीनुसार मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक येथे रु. २,३६,६२,५२४/- एवढी गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेच्या निधीत होणारी वाढ संस्थेचा पाया मजबूत करणारी आहे.

## अन्य निधी :

गतवर्षी अन्य निधी रु. ४,९७,९१,२९८/- असुन व्याज व तरतूदी मुळे रु. ४८,६६,६३२/- ने वाढ होवून मार्च २०२६ अखेर एकूण अन्य निधी रु. ५,४६,५७,९३०/- झालेला आहे. अन्य निधीतील वाढीचे प्रमाण ९.७७% आहे.

## ठेवी :

संस्था देत असलेल्या ग्राहक सेवेमुळे तसेच संचालक मंडळ, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने व तुम्हां सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या ठेवीमध्ये भरघोस वाढ झाली आहे. ठेवी मध्ये वाढ करत असताना सभासदांच्या जास्तीत जास्त हिताचा व संस्थेच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन ठेवीला जास्तीत जास्त व्याज देण्याचा संचालक मंडळाने प्रयत्न केलेला आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. २,१८,७२,८४,५२६/- जमा होते. अहवाल सालात ठेवीमध्ये रु. ३०,०२,०९,०३२/- वाढ झाल्यामुळे वर्षअखेरीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. २,४८,७४,९३,५५८/- जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात ठेवीमध्ये १३.७३% वाढ झालेली आहे. ठेवी मध्ये झालेली वाढ हे संस्थेच्या कार्यावर सभासदांनी ठेवलेल्या विश्वासाची पोच आहे.

## कर्ज :

सभासदांच्या आवश्यकतेनुसार व सुरक्षिततेचा विचार करुन जास्तीत जास्त सभासदांना अर्थ सहाय्य करण्याचा प्रयत्न केला आहे. सहकार क्षेत्रातील स्पर्धा इतर आर्थिक संस्थाचे व्याजदर यामुळे चांगले कर्जदार सभासद संस्थेस सोडून जात आहेत याची दखल घेऊन कर्ज व्याजदरात विविधता आणली आहे. कमी रकमेचे व जास्तीत जास्त सभासदांना कर्ज वाटप करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत.

कर्ज हे संस्थेची मालमत्ता आहे. त्यातूनच संस्थेला उत्पन्न मिळत असते. चांगले कर्जदार मिळणे ही सुध्दा एक स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकाव धरुन संस्थेने चालू वर्षात भरीव कर्ज वितरण करुन कर्जामध्ये गतवर्षीच्या तुलनेत वाढ केलेली आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने महिलांना वैयक्तिक कर्ज संस्थेच्या शाखा स्तरावर देण्याची योजना चालू केली आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस रु. १,८५,८५,८२,९८२/- कर्ज येणे बाकी होते. अहवालसालात रु. १,११,२२,२८,५९२/- कर्ज वितरित केले असुन रु. ८५,९७,९४,९३०/- कर्ज वसुल झालेले आहे. मागील वर्षापेक्षा रु. २५,२४,३३,६६२/- ने कर्जामध्ये वाढ झाली असून वर्षा अखेरीस १०३७८ सभासदांकडून रु. २,११,१०,१६,६४४/- कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात येणे कर्जात १३.५८% वाढ झाली आहे.

## थकबाकी व वसुली :

थकबाकी व वसुली सर्वच आर्थिक क्षेत्रा समोरील एक आव्हान आहे. या आव्हानांचा संस्था मुकाबला करुन थकबाकी कमी करण्याचा सतत प्रयत्न केला जात आहे. थकीत कर्जदारांशी थेट चर्चा करुन त्यांच्या आर्थिक स्थितीचा व अडचणीचा विचार करुन मार्ग काढण्यासाठीचा प्रयत्न आहे. मृत झालेल्या कर्जदार सभासदांना व्याज, दंडव्याज व वसुली खर्चात सवलत देऊन एक रकमी भरण्यास सदर खाते थकबाकीतून काढण्याचा सर्वतोपरी प्रयत्न होत आहे. चालू वर्षात थकबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० कलम १०१ नुसार १७० दावे दाखल केले आहेत.

संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकाट प्रयत्न केले आहेत. संस्थेचा स्वतंत्र कर्ज वसुली विभाग ही अनुत्पादित कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसुली अधिकारी व कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामिनदारांशी संपर्क साधुन कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

## नफा :

आर्थिक क्षेत्रातील स्पर्धात्मक स्थितीत ठेवीवरील व कर्जावरील व्याजदर त्याप्रमाणात ठेवावे लागतात. संस्थेने कर्जामध्ये गुणात्मक वाढ करुन व गुंतवणूकीचे सुयोग्य नियोजन करुन जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

अहवाल सालात निव्वळ नफा रु. १,४०,०१,१५४/- झाला असून त्यात मागील वर्षाचा नफा रु. ३,६८९/- मिळवून विभागणीसाठी रु. १,४०,०४,८४३/- नफा आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| राखीव निधी | २५% | ३५,००,२८८/- |
| लाभांश भाग रक्कम वर प्रमाणात | १०% | ६५,१७,७८०/- |
| सभासद कल्याण निधी | | ७५,०००/- |
| इमारत निधी | | ८,६०,०००/- |
| कर्मचारी कल्याण निधी | | ५०,०००/- |
| बुडीत व संशयीत कर्ज निधी | | ३०,००,०००/- |
| पुढील वर्षाकरीता शिल्लक | | १,७७५/- |
| **एकूण** | | **१,४०,०४,८४३/-** |

## लाभांश :

सध्याच्या आर्थिक उदीतीकरणामुळे संस्थेचा नफा टिकवणे फारच जिकीरीचे झालेले आहे. तरी सुध्दा आपल्या कर्जदार सभासदांनी वसुलीकरीता बहुमोल सहकार्य केल्यामुळेच व ठेवीदार यांनी संस्थेवर दाखविलेला जिव्हाळा, बँकेमध्ये असलेली गुंतवणूक त्यावरील व्याज यामुळेच आपण यावर्षी सभासदांना १०% लाभांश जाहीर केलेला आहे.

## खेळते भांडवल :

गतवर्षी संस्थेचे खेळते भांडवल रु. २,४५,२५,८२,७२६/- होते. त्यात रु. ३१,७७,७६,६६३/- ने वाढ होवून वर्षाअखेरीस खेळते भांडवल रु. २,७७,०३,५९,३८९/- झालेले आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलातील वाढ १२.९५% इतकी आहे. संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये सातत्याने होणारी वाढ संस्थेची आर्थिक प्रगती दर्शविते.

## लेखा परिक्षण :

संस्थेच्या दि. २८/९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२५-२६ चे वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी अधिकृत लेखापालांच्या सुचीमधून मे. एच. पी. भालेकर ॲण्ड असोसिएटस् यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करुन अहवाल सादर केला आहे. संस्थेचे कामकाज व प्रगतीबाबत लेखापरिक्षक यांनी समाधान व्यक्त करुन संस्थेस सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग **अ** देण्यात आला आहे.

## कर लेखापरिक्षण (टॅक्स) :

सन २०२४-२५ या अहवालसालाचे कर लेखापरिक्षण मा. श्री. वाय. एस. मुजुमदार आणि कंपनी सनदी लेखापाल मेंबर नं. ३३७०४ यांनी केले. त्याचा अहवाल २९/१०/२०२५ रोजी संस्थेस सादर केला असून त्यांनी केलेल्या बहुमोल सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

## प्रशिक्षण कार्यशाळा :

अहवाल सालात संस्थेची ध्येय धोरणे ठरवणे. उद्दिष्ट पुर्तीसाठी नियोजन करणे. कर्मचारी यांना अदयावत प्रशिक्षण देणे. यासाठी खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

**लोणावळा** : दि. १३ एप्रिल २०२५ ते दि. १५ एप्रिल २०२५ कोअर बँकिंग प्रणाली, दैनंदिन कामकाज, कर्ज वसुली ठेववृध्दी.

**लोणावळा** : दि. १६ नोव्हेंबर २०२५ ते दि. १८ नोव्हेंबर २०२५ कोअर बँकिंग प्रणाली, दैनंदिन कामकाज, कर्ज वसुली ठेववृध्दी.

**पाचगणी** : दि. २७ फेब्रुवारी २०२६ ते दि. २८ फेब्रुवारी २०२६ कर्जवसुली नियामक मंडळ कार्यपध्दती, आदर्श उपविधी व संचालक मंडळ, जबाबदारी, व्यवसाय वाढ व उत्पन्नाचे स्त्रोत.

संस्थेचे मार्गदर्शक व ज्ञानदीप को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे संस्थापक-संचालक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब सातत्याने संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचे प्रशिक्षण घेत असतात. त्यांच्या प्रशिक्षणामुळे ठरविलेली उद्दिष्टे पूर्ण झाली याचा आम्हांला आनंद आहे. तसेच मुंबई सहकारी बोर्ड, महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई यांच्या सहकार्याने वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. या कार्यक्रमांमध्ये उपस्थितांना मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीस चालना मिळाली.

## पुरस्कार :

**महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई** यांच्या तर्फे देण्यात येणारा **आदर्श पतसंस्था पुरस्कार** २०२४-२५ संस्थेस प्राप्त झाला असुन हा पुरस्कार पुढील विकासाचा टप्पा पार करण्यासाठी स्फुर्तीदायक ठरेल.

## कर्मचारी :

संस्थेतील अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांचेद्वारे अधिकाधिक चांगली ग्राहक सेवा देण्यासाठी, संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. यावर्षी निरनिराळ्या पध्दतीची सांघिक/व्यक्तीगत उद्दीष्टे दिल्यामुळे शाखांतर्गत अधिकारी-कर्मचारी यांचेसाठी वैयक्तिक स्तरावरही व्यवसाय वृध्दीसाठी उत्साहवर्धक वातावरण होते. अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी जोमाने प्रयत्न करुन त्यांची व्यक्तीगत तसेच शाखांसाठीची सामुहिक उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश मिळवले. त्यांचे हे प्रयत्न अभिमानास पात्र आहेत. संस्थेच्या वाढीबरोबर सभासदांचे संस्थेबद्दलचे प्रेम वृध्दींगत करण्याचे कार्य सर्व कर्मचारी करीत आहेत. दि. ३१ मार्च २०२६ अखेरीस संस्थेच्या सेवेत अधिकारी व कर्मचारी मिळून एकूण ६९ कर्मचारी कार्यरत आहेत.

## ठेव प्रतिनिधी :

संस्थेत एकूण १६४ इतके ठेव प्रतिनिधी कार्यरत असून संस्थेस ठेव संकलन करणे. कर्ज वसुलीच्या कामात सहभाग घेणे व संस्थेविषयी प्रचार, प्रसिध्दी करणे अशी महत्वाची कामे त्यांच्याकडून केली जातात. मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या धोरणानुसार प्रत्येक शाखेत किमान १० प्रतिनिधी असावेत. संचालक मंडळ व कर्मचारी यासाठी प्रयत्नशील आहे. इच्छुकांनी स्वयंस्फुर्तीने अशा कामासाठी संस्थेत कार्यरत असावे अशी संचालक मंडळाची अपेक्षा आहे.

## सभासद अपघात विमा :

संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या संकल्पनेतून संस्थेने आपल्या सर्व सभासदांसाठी व कर्जदारांसाठी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले आहे. सर्व सभासदांना विनामूल्य रु. १ लाख अपघात विमा संरक्षण दिले जाते.

## आपला ग्राहक जाणून घ्या :

महाराष्ट्राच्या सहकार विभागाने सभासदांची KYC पूर्ण करण्यासाठी अनेक सुचना लागू केलेल्या आहेत. त्यांचे आपण पालन करीत आहोत. पुर्वीच्या सभासदांनी सुध्दा आपली KYC ची पुर्तता करावी असे आपणांस सुचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर संस्था बरेच व्यवहार सोशल मिडीया मार्फत चालवत आहे. त्यामुळे आपण आपले अदयावत मोबाईल नं. द्यावेत.

## संगणक प्रणाली :

संस्था अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सभासदांना सुलभ व अचूक सेवा देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. भविष्याचा वेध घेऊन डिजीटल व्यवहार करण्यासाठी सभासदांना मोबाईल ॲप दिला आहे. यासाठी कॉमविझार्ड यांच्याकडून अदयावत संगणक प्रणाली घेण्यात आली असून संस्थेचा सर्व शाखा कोअर बँकींग सोलुशन (सी.बी.एस.) ने जोडण्यात आलेल्या आहेत. यामुळेच सभासदांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे शक्य होत आहे. दैनंदिन ठेव सुध्दा मोबाईल ॲप द्वारे सर्व प्रतिनिधी मार्फत जमा केली जाते.

## कोअर बँकिग :

अहवाल वर्षात संस्थेने सभासदांकरीता सुरु केलेल्या विविध डिजीटल सेवांमुळे संस्थेची जनमाणसातील प्रतिमा उंचावली आहे.

### १. एस. एम. एस. सुविधा :

संस्थेने एस. एम. एस. सुविधा सुरु करुन सभासदांना खात्यामधील व्यवहाराची माहिती, ठेव मुदतपुर्ती दिनांक, खात्यावरील भरणा केलेली रक्कम, खात्यावरील जमा असलेली रक्कम, कर्ज हप्ता (ईएमआय) सुचना इत्यादी माहिती एस. एम. एस. सुविधेद्वारे देण्यात येते.

### २. दैनंदिन ठेव ॲप :

संस्थेची दैनंदिन ठेव ही देखील संस्थेच्या मोबाईल ॲपद्वारे होत असुन त्याचा त्वरीत एस. एम. एस. खातेदाराला जात आहे. त्यामुळे त्यामध्ये देखील अचुकता आली आहे.

### ३. मोबाईल ॲप :

सभासदांना आपले संस्थेतील खात्यावरील व्यवहार त्वरीत करता यावेत व त्याची माहिती व्हावी याकरीता मोबाईल बँकींग ॲपची सुविधा चालु करण्यात आली आहे. त्यामधुन खातेदारांना त्वरीत व्यवहार करता येणे शक्य होणार आहे. खातेदार आपली रक्कम हस्तांतर, फोन बिल, गॅस बिल, लाईट बिल, टिव्ही रिचार्ज इत्यादी सेवांचा लाभ घेता येणार आहे.

### ४. आर. टी. जी. एस./एन. ई. एफ. टी. :

या प्रणालीद्वारे ग्राहकांना सशुल्क सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे खातेदारांची वेळेची व खर्चाची फार मोठी बचत होणार आहे.

## मुख्य कार्यालय शुभारंभ :

संस्थेने प्रशासकीय कार्यालयासाठी सुसज्ज अशी १४० चौ. फुट जागा २०२, दामजी शामजी बिझनेस पार्क ७८, स्टेशन रोड, कांजूरमार्ग (प.) येथे घेतली आहे. या प्रशासकीय कार्यालयाचा शुभारंभ दि. १ जानेवारी २०२६ रोजी मा. श्री. अजयकुमार भालके साहेब, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था एस. विभाग व संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. व्हि. जी. पवार साहेब यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कुर्ला नागरीक सहकारी बँकेचे अध्यक्ष धोंडे पाटील साहेब, संजय पवार साहेब, डि. एम. के. जावली सहकारी बँकेचे अध्यक्ष

भिलारे साहेब, ज्ञानदीप अध्यक्ष जे. एस. पवार, शिवकृपा सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष गोरख चव्हाण साहेब, पतसंस्था व्यवस्थापन डायरीचे संपादक श्री. अंकुश जाधव साहेब, उन्नती मायक्रो फायनान्सचे संचालक हनुमंत रांजणे साहेब, वैधानिक लेखापरीक्षक ईश्वर चव्हाण साहेब आणि इतर सहकारी संस्थातील पदाधिकारी उपस्थित होते.

**कार्यालय खरेदी :**

संस्थेची शाखा धनकवडी येथे भाडे तत्वावरील जागेत चालू होती. तेथे होणाऱ्या व्यवसायात वाढ होत होती. त्यामुळे तेथे स्वमालकीची जागा घेण्याचे निश्चित केले होते. त्यानुसार धनकवडी शाखा कार्यालयाकरीता नवीन स्वमालकीची जागा शॉप नं. १४, अर्थवपुरम इमारत, धनकवडी, पुणे येथे घेण्यात आली.

**श्रध्दांजली :**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्राचे धडाडीचे उपमुख्यमंत्री कै. अजित दादा पवार यांचे दुर्देवी विमान अपघातामध्ये निधन झाले तसेच सहकार क्षेत्रातील ज्ञात-अज्ञात असलेले सभासद, ठेवीदार, हितचिंतक व भारतीय जवान यांचे अहवाल वर्षी दु:खद निधन झाल्यामुळे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर ओढावलेल्या दु:खात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

**आभार :**

संस्थेला सहकार क्षेत्रात नावलौकीक प्राप्त करुन देण्यासाठी सतत कार्यरत असणाऱ्या ठेव प्रतिनिधी, संचालक मंडळ व सभासद वर्ग यांचे मी मन:पुर्वक अभिनंदन करतो.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकारमंत्री, सर्व राज्यमंत्री, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे व त्यांचे सर्व अधिकारी वर्ग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुर्व उपनगरे (२), कोकण भवन, नवी मुंबई, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, त्यांचे सर्व अधिकारी तसेच मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था 'एस' विभाग, कोकण भवन, त्यांचे सर्व सहकारी, अधिकारी संस्था कार्यक्षेत्रातील सहकार खात्याचे विविध पदाधिकारी यांची संस्था ऋणी आहे. तसेच कामकाजास विशेष मदत करणारे मा. जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलिस निरीक्षक व त्यांचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

मा. आ. प्रविण दरेकर - अध्यक्ष मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, मा. शिवाजीराव नलावडे - अध्यक्ष बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, सर्व सहकारी संचालक, मा. श्री. जे. एस. पवार - महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मा. अंकुश जाधव - संपादक पतसंस्था व्यवस्थापन डायरी, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ज्ञानदिप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., डीएमके जावली सहकारी बँक लि., कुर्ला नागरीक सहकारी बँक, नवी मुंबई सहकारी बँक, संत सोपान काका सहकारी बँक, मुंबई सहकारी बोर्ड तसेच संस्थेशी संलग्न असलेल्या सहकारी पतसंस्थाचे, सहकारी बँकाचे अध्यक्ष, पदाधिकारी व संचालक मंडळ यांची संस्था ऋणी आहे.

संस्थेचे कायदेविषयक सल्लागार, मालमत्ता व सोने यांचे मुल्यांकन करणारे व्हॅल्युअर, अंतर्गत हिशोब तपासनीस, वैधानिक लेखा परिक्षक यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संस्था ऋणी आहे. संस्थेचे संगणक प्रणाली विकासक, मे. कॉमविझार्ड प्रणालीचे प्रदिप भाटीया व युसुफ सर यांचे सर्व कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

एका अभिमानास्पद वळणावरुन संस्थेच्या प्रगतीचा प्रवास सुरु आहे. नव्या जबाबदाऱ्या, नवीन आकांक्षा, नवीन अपेक्षा, नव्या स्वप्नांच्या क्षितीजाकडे झेपावत असताना आपणां सर्वाच्या सहकार्याची अपेक्षा ठेवून हा अहवाल पूर्ण करीत आहे.

आपला विनम्र,
**गणपतराव आनंदराव पवार**
अध्यक्ष

# ❁ परिशिष्ट - अ ❁

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. | | |
| नोंदणी कार्यालय पत्ता | : | १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८. | | |
| नोंदणी क्रमांक व दिनांक | : | BOM/WS/RSR/CR/८३७४/१९९८, दि. ३१/१२/१९९८ | | |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा, अ.नगर जिल्ह्यापुरते. | | |
| अधिकृत भाग भांडवल | : | १०,००,००,०००/- | | |
| सभासद संख्या | : | २१०४१ | वसुल भाग भांडवल | : ६,८०,९८,७००/- |
| राखीव व इतर निधी | : | ७,७२,९१,६७६/- | | |
| ठेवी | : | २,४८,७४,९३,५५८/- | | |
| गुंतवणूका | : | ४२,१६,०६,७२५/- | | |
| कर्जे | : | २,११,१०,१६,६४४/- | | |
| अहवाल वर्षात निव्वळ नफा | : | १,४०,०१,१५४/- | | |
| खेळते भांडवल | : | २७७.०३ कोटी | संमिश्र व्यवसाय | : ४५९.८५ कोटी |
| सी. डी. रेशो | : | ७९.२८% | ऑडीट वर्ग | : अ |
| कर्मचारी संख्या | : | ६९ | ठेव प्रतिनिधी | : १६४ |
| शाखा | : | १८ + १ मुख्यालय | | |

# ❁ सभासदांना आवाहन ❁

१) ज्या सभासदांनी भाग दाखले घेतले नाहीत त्यांनी संस्थेच्या शाखेतून घ्यावेत.

२) आपली के.वाय.सी. पुर्तता करावी. उदा. (पत्ता, मोबाईल नं., वारस).

३) कर्ज मागणी अर्ज व तद्संबंधी कागदपत्रे परिपुर्ण दिल्यास कर्ज वितरण करणे सुलभ होईल.

४) केवळ कर्ज घेणे हा उद्देश न ठेवता आपल्या उत्पन्नातून संस्थेच्या ठेव योजनेत रक्कम गुंतवा व भविष्यातील गरजांची तरतूद करा.

५) संस्थेच्या प्रगतीसाठी व तत्पर सेवेसाठी आपल्या कल्पना व सुचना कळवा.

६) ज्या सभासदांचा भाग रक्कम रु. १०००/- पेक्षा कमी आहे त्यांनी किमान रु. १०००/- भाग रक्कम करावी.

# BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2026

| 31/03/2025 | Liabilities | Amount | 31/03/2026 |
|---|---|---|---|
| | **Authorised Share Capital** अधिकृत भाग भांडवल | | **10,00,00,000.00** |
| 6,51,77,800.00 | Paid up Share Capital वसुल भाग भांडवल | 6,51,77,800.00 | |
| 0.00 | Add - Rec. During the year अधिक अहवालसाली जमा | 55,21,700.00 | |
| 0.00 | Less - Refund During the year अहवालसाली परत | 26,00,800.00 | 6,80,98,700.00 |
| | **Reserve & Other Funds** राखीव व इतर निधी | | |
| 1,94,26,561.00 | Reserve Fund राखीव निधी | 2,26,33,746.00 | |
| 0.00 | Enterance Fee प्रवेश फी | 0.00 | |
| 0.00 | B Class Member नाममात्र सभासद | 0.00 | 2,26,33,746.00 |
| 1,83,57,755.00 | Reserve for Bad & Doubtful Debts बुडीत कर्ज निधी | 2,00,12,355.00 | |
| 2,61,26,181.00 | Building Fund इमारत निधी | 2,83,96,181.00 | |
| 5,62,491.00 | Member Welfare Fund सभासद कल्याण निधी | 6,37,491.00 | |
| 8,02,620.00 | Staff Welfare Fund कर्मचारी कल्याण निधी | 9,87,858.00 | |
| 3,61,551.00 | Charitable Fund धर्मदाय निधी | 5,47,945.00 | |
| 35,80,700.00 | Standard Assets Prov. उत्पादीत कर्ज तरतूद | 40,76,100.00 | 5,46,57,930.00 |
| | **Deposits** ठेवी | | |
| 12,09,12,623.00 | Daily Deposits दैनंदिन ठेव | 14,63,87,298.00 | |
| 8,00,47,794.00 | Saving Deposits बचत ठेव | 7,68,18,747.00 | |
| 2,72,19,960.00 | Recurring Deposits आवर्त ठेव | 3,53,99,802.00 | |
| 53,14,55,267.00 | Fixed Deposits मुदत ठेव | 62,12,24,187.00 | |
| 4,34,30,952.00 | Double Benefit Deposits दामदुप्पट ठेव | 4,35,11,340.00 | |
| 2,82,950.00 | Agent Security Deposits प्रतिनिधी सुरक्षा ठेव | 2,72,750.00 | |
| 33,92,08,775.00 | Monthly Interest Deposits मासिक व्याज ठेव | 39,29,51,966.00 | |
| 62,95,53,563.00 | Shubarambh Deposits शुभारंभ ठेव | 65,07,74,833.00 | |
| 11,61,33,306.00 | Short Term Deposits अल्प मुदत ठेव | 13,69,02,090.00 | |
| 75,94,493.00 | Pushpanand Deposits पुष्पानंद ठेव | 1,22,11,657.00 | |
| 26,95,662.00 | Loan/Staff Security Deposits कर्ज सुरक्षा ठेव | 32,35,299.00 | |
| 89,28,802.00 | Lakpati Deposits लखपती ठेव | 1,05,06,815.00 | |
| 74,000.00 | Suvarna/Vidhyut Pushpa Deposits सुवर्ण/विद्युत पुष्प ठेव | 10,000.00 | |
| 38,66,622.00 | Pushpasamruddhi Deposits पुष्प समृध्दी ठेव | 1,00,86,201.00 | |
| 1,85,000.00 | Viman Pushpa Deposits विमान पुष्प ठेव | 75,000.00 | |
| 27,56,94,757.00 | Pratham Deposits प्रथम ठेव | 34,71,25,573.00 | 2,48,74,93,558.00 |
| 7,74,88,834.00 | **Borrowings** बँक ओडी खाते | | 7,21,91,530.00 |
| | **Other Liabilities** इतर देणी व तरतुदी | | |
| 18,115.00 | Surcharge Account सरचार्ज खाते | 10,500.00 | |
| 11,000.00 | Professional Tax (PT) व्यवसाय कर | 12,200.00 | |
| 39,759.00 | Insurance & Development Fund विकास निधी | 8,074.00 | |
| 1,43,445.00 | Tax Deducted at Source टी. डी. एस. खाते | 1,46,552.00 | |
| 11,67,000.00 | Audit Fee Payable ऑडीट फी देय | 12,07,000.00 | |
| 2,18,860.00 | Employees P. F. Contribution कर्मचारी पी. एफ. | 2,40,923.00 | |
| 2,50,000.00 | Earnest Money Khandala खंडाळा | 2,50,000.00 | 18,75,249.00 |
| 36,87,962.00 | Unclaimed Dividend न घेतलेला लाभांश | 62,61,583.00 | 62,61,583.00 |
| 3,55,21,919.00 | **Interest Payable** ठेवीवरील देणे व्याज | 4,31,42,250.00 | 4,31,42,250.00 |
| 1,23,55,647.00 | **P & L Appropration A/c** नफा तोटा खाते | 3,689.00 | |
| | Add : Current year profit अधिक चालू वर्षाचा नफा | 1,40,01,154.00 | 1,40,04,843.00 |
| **2,45,25,82,726.00** | **Total** | | **2,77,03,59,389.00** |

**M/s. H. P. Bhalekar & Co.** (Chartered Accountant)

## BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2026

| 31/03/2025 | Assets | Amount | 31/03/2026 |
|---|---|---|---|
| | **Cash & Bank Balance** रोख व बँक शिल्लक | | |
| 76,96,968.00 | Cash in Hand रोख शिल्लक | 66,67,924.00 | |
| 1,45,91,197.00 | Cash at Bank बँक शिल्लक | 2,10,00,485.00 | 2,76,68,409.00 |
| | **Investments** गुंतवणूक | | |
| 11,44,43,257.00 | F.D. at M.D.C. Bank मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक | 13,60,55,861.00 | |
| 15,75,50,897.00 | F.D. at Jaoli/Satara Bank मुदत ठेव जावली/सातारा बँक | 20,23,82,582.00 | |
| 6,34,88,364.00 | F.D. at Sopan Bank मुदत ठेव सोपान बँक | 3,41,27,788.00 | |
| 1,52,43,199.00 | F.D. at Saraswat Bank मुदत ठेव सारस्वत बँक | 87,16,356.00 | |
| 2,44,89,223.00 | F.D. with Society मुदत ठेव सोसायटी | 1,57,10,114.00 | |
| 2,07,02,677.00 | F.D. at M.D.C.C. Bank (R/F) मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक | 2,36,62,524.00 | |
| 9,21,000.00 | Share with M.D.C. Bank भाग मुंबै बँक | 9,21,000.00 | |
| 10,000.00 | Share with K.S.S.K. Ltd. भाग साखर कारखाना | 10,000.00 | |
| 1,000.00 | Share with M.R.S.P. Fed. भाग महा. पतसंस्था फेडेरेशन | 1,000.00 | |
| 9,500.00 | Share with P.U.Z.P. Fed. भाग पूर्व उपनगरे फेडेरेशन | 9,500.00 | |
| 10,000.00 | Share with D.G.C. Ltd. भाग डी.जी.सी. लि. | 10,000.00 | 42,16,06,725.00 |
| | **Security Deposits** सुरक्षा अनामत | | |
| 13,320.00 | Telephone Deposits टेलिफोन अनामत | 13,320.00 | |
| 17,725.00 | Electricity Deposits विज अनामत | 20,095.00 | |
| 2,98,35,239.00 | Office Building कार्यालय इमारत | 6,71,60,012.00 | |
| 2,23,02,100.00 | Building Security Depo. इमारत अनामत | 3,02,93,117.00 | |
| 5,000.00 | Security Depo. at BEST बी.ई.एस.टी. अनामत | 5,000.00 | |
| 5,10,000.00 | Office Deposits कार्यालय अनामत | 5,10,000.00 | |
| 6,85,427.00 | Security Depo. at Msed महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रीक बोर्ड | 6,10,023.00 | 9,86,11,567.00 |
| | **Fixed Assets** कायम स्वरुपी मालमत्ता | | |
| 62,099.00 | Air Condition ए. सी. | 47,325.00 | |
| 84,41,289.00 | Furniture & Fixture फर्निचर व फिक्चर | 1,22,25,217.00 | |
| 49,89,509.00 | Computer Equipments संगणक | 56,94,798.00 | |
| 3,13,913.00 | Daily Collection Machine दै. कलेक्शन मशीन | 2,52,253.00 | |
| 68,063.00 | Vehicle Motor Cycle मोटर सायकल | 51,047.00 | 1,82,70,640.00 |
| | **Loan** कर्ज | | |
| 3,81,88,210.00 | Personal Loan वैयक्तिक कर्ज | 4,66,37,302.00 | |
| 2,44,43,798.00 | Daily Personal Loan दै. ठेव वैयक्तिक कर्ज | 3,01,38,421.00 | |
| 26,69,17,605.00 | Group Personal Loan गट वैयक्तिक कर्ज | 24,12,21,848.00 | |
| 4,08,71,517.00 | Vehicle Loan वाहन कर्ज | 2,72,12,469.00 | |
| 87,31,75,575.00 | Business Loan व्यवसाय कर्ज | 96,36,29,753.00 | |
| 17,90,44,070.00 | Against Depo. Loan ठेव तारण कर्ज | 23,05,93,911.00 | |
| 3,97,56,340.00 | Security Personal Loan सुरक्षित वैयक्तिक कर्ज | 7,18,39,473.00 | |
| 31,03,73,229.00 | Arbitration Loan लवादी कर्ज | 33,91,87,831.00 | |
| 16,78,683.00 | Staff Vehicle Loan कर्मचारी वाहन कर्ज | 13,86,001.00 | |
| 74,76,127.00 | Staff Personal Loan कर्मचारी वैयक्तिक कर्ज | 80,43,101.00 | |
| 5,33,53,847.00 | Staff Housing Loan कर्मचारी गृहतारण कर्ज | 6,32,87,652.00 | |
| 1,67,30,223.00 | Gold Loan सोने तारण | 7,72,72,933.00 | |
| 65,73,758.00 | Agent Personal Loan एजंट वैयक्तिक कर्ज | 1,05,65,949.00 | 2,11,10,16,644.00 |
| 7,90,92,459.00 | **Int. Receivable** व्याज येणे | 8,78,07,384.00 | 8,78,07,384.00 |
| | **Other Assets** इतर मालमत्ता | | |
| 2,39,71,360.00 | Office Primises Advance ऑफिस प्रिमायसेस ॲडव्हान्स | 10,01,000.00 | |
| 32,190.00 | Adheshive Stamps अधेसिव्ह स्टॅम्प | 30,070.00 | |
| 34,86,103.00 | T.D.S. Receivable टी.डी.एस. | 33,81,275.00 | |
| 10,14,916.00 | Sainath Credit Society साईनाथ क्रे. सोसा. | 9,13,425.00 | |
| 1,750.00 | Advertisement जाहिरात | 52,250.00 | 53,78,020.00 |
| **2,45,25,82,726.00** | **Total** | | **2,77,03,59,389.00** |

**Arjun J. Bhosale** (Vice-Chairman) **G. A. Pawar** (Chairman)

# PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2026

| 31/03/2025 | Expenditure | Amount | 31/03/2026 |
|---|---|---|---|
| 17,81,32,633.00 | **Interest on Deposits** ठेवीवरील व्याज | | 21,73,95,281.00 |
| 66,83,632.00 | **Interest on Bank Loan** बँक कर्जावरील व्याज | | 68,89,618.00 |
| 2,46,68,796.00 | Salary पगार | 2,71,39,501.00 | |
| 3,92,638.00 | Stipend विद्यावेतन | 12,64,789.00 | |
| 11,74,001.00 | Bonus & Emp. Gratuity बोनस व कर्मचारी ग्रॅज्युटी | 14,50,725.00 | |
| 27,59,587.00 | Employee P. F. Exp. कर्मचारी पी. एफ. खर्च | 29,79,565.00 | 3,28,34,580.00 |
| 1,63,992.00 | Postage & Telegram पोस्टेज व टेलिग्राम | 1,96,344.00 | |
| 10,19,157.00 | Rents कार्यालय भाडे | 10,46,614.00 | |
| 3,82,325.00 | Travelling Exp. प्रवास खर्च | 4,21,782.00 | |
| 4,37,489.00 | Electricity Exp. वीज खर्च | 5,04,589.00 | |
| 12,59,520.00 | Insurance Exp. विमा खर्च | 8,26,000.00 | |
| 2,00,976.00 | Repair & Maintance दुरुस्ती खर्च | 2,67,112.00 | |
| 2,96,903.00 | Annual Maintanance Exp. वार्षिक देखभाल खर्च | 3,49,950.00 | |
| 4,880.00 | GST Exp. जी. एस. टी. खर्च | 2,712.00 | |
| 3,15,396.00 | Misc. Exp. किरकोळ खर्च | 3,06,612.00 | |
| 17,898.00 | News Paper वर्तमान पत्र | 19,713.00 | |
| 4,94,825.00 | Printing & Stationary छपाई स्टेशनरी खर्च | 5,05,852.00 | |
| 1,38,074.00 | Pooja Exp. पूजा खर्च | 1,58,398.00 | |
| 1,95,004.00 | Telephone Exp. टेलिफोन खर्च | 2,13,521.00 | |
| 68,92,893.00 | Commission Exp. कमिशन खर्च | 87,16,148.00 | |
| 10,630.00 | Legal Fees कायदेशीर शुल्क | 81,930.00 | |
| 11,10,852.00 | Loan Recovery Charges कर्ज वसुली खर्च | 13,72,471.00 | |
| 88,349.00 | Bank Charges बँक चार्जेस | 1,32,814.00 | |
| 14,05,226.00 | Audit Exp. लेखापरिक्षण फी | 14,94,104.00 | |
| 43,801.00 | Advertisement जाहिरात | 45,122.00 | |
| 1,50,600.00 | Professional Charges व्यवसाय खर्च | 4,76,060.00 | |
| 5,51,927.00 | Entertainment Exp. चहापान खर्च | 5,58,173.00 | |
| 81,344.00 | A. G. M. Exp. वार्षिक सभा खर्च | 89,300.00 | |
| 0.00 | Locker Rent Exp. लॉकर भाडे खर्च | 9,494.00 | |
| 14,57,375.00 | Recovery Charges वसुली खर्च | 18,46,658.00 | |
| 2,07,409.00 | Cleaning Exp. साफसफाई खर्च | 2,49,293.00 | |
| 59,735.00 | Water Exp. पाणी बिल | 1,13,159.00 | |
| 1,70,016.00 | Training Exp. प्रशिक्षण खर्च | 2,37,523.00 | |
| 1,17,094.00 | Meeting Exp. सभा खर्च | 97,760.00 | |
| 88,874.00 | Branch Opening Exp. शाखा खर्च | 3,32,918.00 | |
| 87,816.00 | Election Exp. निवडणूक खर्च | 0.00 | |
| 1,250.00 | Subscription सदस्यता | 0.00 | |
| 1,00,000.00 | Pro For RBDD आरबीडीडी | 0.00 | |
| 40,611.00 | T.D.S. Exp. (Mseb) टॅक्स | 0.00 | 2,06,72,126.00 |
| 1,75,92,241.00 | **Depriciation** घसारा | 27,10,483.00 | 27,10,483.00 |
| 1,23,55,201.00 | **Profit & Loss A/c** नफा तोटा खाते | 1,40,01,154.00 | 1,40,01,154.00 |
| **24,46,56,935.00** | **Total** | | **29,45,03,242.00** |

**M/s. H. P. Bhalekar & Co.** (Chartered Accountant)

# PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2026

| 31/03/2025 | Income | Amount | 31/03/2026 |
|---|---|---|---|
| 2,54,57,129.00 | Interest on Bank Deposit ठेवीवरील व्याज | 3,03,35,539.00 | |
| 21,62,17,387.00 | Interest on Loan कर्जावरील व्याज | 26,12,66,281.00 | 29,16,01,820.00 |
| 16,03,569.00 | Misc. Income किरकोळ जमा | 16,14,718.12 | |
| 1,93,860.00 | M.s.e.d. Commission एम. एस. ई. डी. कमिशन | 1,22,424.00 | |
| 11,84,990.00 | Processing Charges सर्व्हिस चार्ज | 11,64,280.00 | |
| 0.00 | Dividend on M.D.C. Bank लाभांश मुंबै बँक | 0.00 | 29,01,422.00 |
| **24,46,56,935.00** | **Total** | | **29,45,03,242.00** |

**Arjun J. Bhosale** (Vice-Chairman) **G. A. Pawar** (Chairman)

# पुष्पक
## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## ❁ अंदाजपत्रक २०२६-२७ ❁

| भांडवल व देणी | अंदाज सन २५/२६ | प्रत्यक्ष सन २५/२६ | अंदाज सन २६/२७ | मालमत्ता व येणी | अंदाज सन २५/२६ | प्रत्यक्ष सन २५/२६ | अंदाज सन २६/२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वसुल भाग भांडवल | ७२९९९१३६ | ६८०९८७०० | ७६२७०००० | रोख व बँक शिल्लक | २७८६०२०६ | २७६६८४०९ | ३४५६८७१० |
| राखीव व इतर निधी | ७९४७०३५७ | ७७२९१६७६ | ८६५६६६७७ | गुंतवणुक | ५२७८३५९२६ | ४२१६०६७२५ | ६१४२३६९४४ |
| सभासद ठेवी | २६९२५४७२५२ | २४८७४९३५५८ | ३०४१७०७१२३ | सभासद कर्ज | २२६७४८१२३८ | २१११०१६६४४ | २४७९७१९९७३ |
| ठेवीवरील व्याज तरतुद | ४०४९४९८७ | ४३१४२२५० | ४९१८२१६५ | कायम व इतर मालमत्ता | १५२५२३६० | १८२७०६४० | २००९७७०४ |
| इतर येणी व तरतुदी | ८३४२२७२४ | ७४०६६७७९ | ८२१००५६३ | सुरक्षा अनामत/कार्यालय | ५८७०५६९२ | ९८६११५६७ | १०८४७२७२४ |
| लाभांश देणे बाकी | ४०९३६३८ | ६२६१५८३ | ६९८१६६५ | ठेवीवरील येणे व्याज | ८६२१२६८८ | ८७८०७३८४ | ९६५८८१२३ |
| एकूण नफा | १४२०८९९४ | १४००४८४३ | १६७९१८०७ | इतर येणी | ३८८८९७८ | ५३७८०२० | ५९१५८२२ |
| **एकूण** | **२९८७२३७०८८** | **२७७०३५९३८९** | **३३५९६००००००** | **एकूण** | **२९८७२३७०८८** | **२७७०३५९३८९** | **३३५९६००००००** |

| खर्च तपशील | अंदाज सन २५/२६ | प्रत्यक्ष सन २५/२६ | अंदाज सन २६/२७ | जमा तपशील | अंदाज सन २५/२६ | प्रत्यक्ष सन २५/२६ | अंदाज सन २६/२७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | २०४८५२५२८ | २१७३९५२८१ | २५०००४५७३ | कर्जावरील व्याज | २४८६४९९९५ | २६१२६६२८१ | ३००४५६२२३ |
| बँक कर्ज व्याज | ७६८६१७७ | ६८८९६१८ | ७३६८१०६ | इतर उत्पन्न | ३४२९७८२ | २९०१४२२ | ३३३६६३६ |
| पगार व इतर भत्ते | ३३३४४२७५ | ३२८३४५८० | ३७७५९७६७ | बँक लाभांश | ० | ० | ० |
| प्रशासकीय खर्च | २०२७५४७५ | २०६७२१२६ | २३७७२९४५ | गुंतवणुकीवरील व्याज | २९२७५६९८ | ३०३३५५३९ | ३४८८५८७० |
| तरतुदी व इतर खर्च | ९८८०२६ | २७१०४८३ | २९८१५३१ | | | | |
| नफा | १४२०८९९४ | १४००११५४ | १६७९१८०७ | | | | |
| **एकूण** | **२८१३५५४७५** | **२९४५०३२४२** | **३३८६७८७२९** | **एकूण** | **२८१३५५४७५** | **२९४५०३२४२** | **३३८६७८७२९** |

## ❁ संचालक मंडळ सभा ❁

| क्र. | संचालकांची नावे | एकूण | क्र. | संचालकांची नावे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. गणपतराव आनंदराव पवार | २२ | ८. | श्री. संकेत किरण पवार | १५ |
| २. | श्री. अर्जुन जयसिंग भोसले | २० | ९. | श्री. श्रीकांत राजाराम कांबळे | १७ |
| ३. | श्री. परशुराम शंकर फडतरे | १९ | १०. | श्री. नारायण मल्हारी कुदळे | १२ |
| ४. | श्री. संभाजी गेणबा पवार | १८ | ११. | श्री. नारायण जिजाबा पालवे | १ |
| ५. | श्री. अंकुश जोतिबा संकपाळ | ११ | १२. | सौ. शशिकला विश्वनाथ पवार | १२ |
| ६. | श्री. व्यासदेव सुखदेव पवार | १२ | १३. | सौ. मिनाक्षी अशोक ढमाळ | ११ |
| ७. | श्री. विनायक पंडीत तळेकर | १८ | | | |

## नमुना 'एन-२'

(कलम ८१ आणि नियम ६९ (३) नुसार)

## वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल

प्रति,
अध्यक्ष
**पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**
१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८.

**आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैद्यानिक लेखापरिक्षण अभिप्राय :**

१. पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या संस्थेचे दि. १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केलेले असून, त्यामध्ये दि. १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ या दिनांकाचा ताळेबंद व त्या दिनांकास संपणारे नफा-तोटा पत्रक आणि त्यात समाविष्ट केलेल्या हिशोबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

**आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :**

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चुक यामुळे होणाऱ्या लक्षनीय चुकांपासून मुक्त राहतील, अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी :**

३. आर्थिक पत्रके बनविणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मान दंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेली आहे. ह्या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची अकानी व अमंलबजावणी अशा प्रकारे करावी की ज्या येणे हिशोबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

४. लेखापरिक्षणामध्ये उघड न झालेले दोष आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनीयोजनेच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षणामध्ये जमा खर्चाच्या मुल्यांकनाच्या विनीयोजनेचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण याचा समावेश आहे.

५. आमच्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

**अभिप्राय :**

६. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेली टिपणी व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६०, नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थासाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.
   १. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०२६ ची स्थिती आणि
   २. नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

**इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय :**

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तयार करण्यात आलेली आहेत.

**मी अहवाल करतो की :**

८. अ. लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.
   ब. आमच्या तपासणीतून जीतपत दृष्टीपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.
   क. संस्थेच्या शाखांचे हिशोबाची तपासणी करुन आलेले शाखा लेखापरिक्षकांचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.
   ड. संस्थेस चालू तपासणी कालावधी सन २०२५-२६ या वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग **'अ'** देण्यात आलेला आहे.

सही,
**मे. एच. पी. भालेकर अॅन्ड असोसिएटस्**
सनदी लेखापाल
सहकारी संस्था, पॅनल क्र. १०९४५-ए-१

दिनांक : २९ जुलै २०२६

# ❁ पोटनियम दुरुस्ती ❁

| पोटनियम क्रमांक | अस्तित्वात असलेली शब्द रचना | उपविधी दुरुस्ती नंतरची शब्द रचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| १ ते ७२ | नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे आदर्श उपविधी (२०१३) महाराष्ट्र राज्य. | नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे आदर्श उपविधी (२०२५) महाराष्ट्र राज्य (पृष्ठ क्र. १ ते ७२). | मा. सहकार आयुक्त निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि. २१/०७/२०२५ रोजीचे पत्र. |
| २ | नोंदणीकृत कार्यालय :<br>संस्थेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय : १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. रोड, कांजूरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८ या पत्त्यावर असेल. | संस्थेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय :<br>२०२, दामजी शामजी बिझनेस पार्क ७८, हुमा सिनेमाच्या मागे, स्टेशन रोड, कांजूरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८. | संस्थेने मुख्य कार्यालयासाठी स्वमालकीची जागा खरेदी केल्यामुळे |
| ३ | संस्थेचे कार्यक्षेत्र :<br>संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, अ. नगर यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. | संस्थेचे कार्यक्षेत्र :<br>संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. | संस्थेचे सभासद वाढीसाठी व विकासासाठी तसेच अनेक सभासद हे आपल्या मुळ गावी गेले असल्यामुळे. |

# ❁ पुष्पक प्रगती अहवाल ❁

| तपशील | मार्च २०२१ | मार्च २०२२ | मार्च २०२३ | मार्च २०२४ | मार्च २०२५ | मार्च २०२६ |
|---|---|---|---|---|---|---|
| सभासद | ९५७३ | ११३४० | १३५२१ | १६१५८ | १८६०९ | २१०४१ |
| वसुल भाग भांडवल | ४५२०७८०० | ४६०५८७०० | ५९४१४९०० | ६३३५६००० | ६५१७७८०० | ६८०९८७०० |
| राखीव व इतर निधी | ४७३२४६६७ | ४८८००८२४ | ५५६२४५५९ | ६३९५०५२५ | ६९१०४६५९ | ७७२९१६७६ |
| एकूण ठेव | १०८७४८४४०१ | १२४५५५१२४७ | १४६६९८७५५१ | १८५१०९२१६९ | २१८७२८४५२६ | २४८७४९३५५८ |
| कर्ज येणे | १०७७१२८९१३ | ११९९००४२४१ | १३५४३६५६२४ | १६४००२८१९७ | १८५८५८२१९२ | २१११०१६६४४ |
| गुंतवणूक | २१७८१८०८० | २४२७७९९०५ | २९५२७७१२७ | ३०५७२३१२३ | ३९६८६९११७ | ४२१६०६७२५ |
| निव्वळ नफा | ४६९००८२ | ७६४८४८८ | ८८६६७९७ | ९७७६६३३ | १२३५५२०१ | १४००४८४३ |
| लाभांश | ८% | ८% | १०% | १०% | १०% | १०% * |
| खेळते भांडवल | १३८९८७४९६४ | १५४३५५६४५३ | १७७११४५३४७ | २११५५००९९६ | २४५२५८२७२६ | २७७०३५९३८९ |
| ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ |
| कर्मचारी व प्रतिनिधी | ११९ | ११३ | १५२ | १५७ | २०३ | २३३ |

# पुष्पक

को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.



संस्थेच्या हडपसर शाखेचा उद्घाटन समारंभ




महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई आदर्श पतसंस्था पुरस्कार २०२४-२०२५






पुष्पक परिवार




मुख्य कार्यालय उद्घाटन समारंभ क्षणचित्रे

## संस्थेची शाखा कार्यालये

| | | | |
|---|---|---|---|
| कांजुरमार्ग | ७०२८०००७०१ | चेंबूर | ७०२८०००७०२ |
| मुलुंड | ७०२८०००७०३ | जुईनगर | ७०२८०००७०४ |
| लोणंद | ७०२८०००७०५ | ठाणे | ७०२८०००७०६ |
| साकीनाका | ७०२८०००७०७ | सातारा | ७०२८०००७०८ |
| खंडाळा | ७०२८०००७०९ | काळेवाडी पुणे | ७०२८०००७१५ |
| नायगांव (वसई) | ७०२८०००७१६ | वाई | ७०२८०००७१९ |
| परेल | ७०२८०००७५५ | विंग (सातारा) | ७०२८०००७७१ |
| नऱ्हे (पुणे) | ७०२८०००७२६ | कामोठे | ७०२८०००७७६ |
| धनकवडी | ७०२८०००७३२ | हडपसर | ७०२८०००७३३ |
| कोथरूड (नियोजित) | ७०२८०००७३४ | सासवड (नियोजित) | ९७६५२८०७२५ |

# पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

प्रशासकीय कार्यालय : २०२, दामजी शामजी बिझनेस पार्क ७८,
हुमा सिनेमाच्या मागे, स्टेशनरोड, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८
७०२८०००७८७ www.pushpaksociety.com pushpakcr@gmail.com

बुक - पोष्ट

प्रति,
श्री./श्रीमती ______________________

Matoshree Design : 9082204814